SPANDAN Career Institute
The way of success...
SINCE 2008

# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

**A**

**प्रश्नपुस्तिका क्र.**

**BOOKLET No.** **EV2020**

**Total Que. : 100**
**Marks : 200**
**Time : 120 min**

**Mob. No. 9923262977**

**Date :27/01/2020**

**राज्यसेवा (पूर्व) सराव परिक्षा - 2020**


**विषय : — पर्यावरण [099]**

**पेपर क्र. (९)**

**सूचना**

१. <u>सदर प्रश्नपुस्तिकेत १०० अनिवार्य</u> प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पर्यवेक्षकाकडून लगेच बदलून घ्यावी.

२. आपला परीक्षा—क्रमांक हया चौकोनांत न विसरता बॉलपेनने लिहावा.




३. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला ४ पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना १,२,३ आणि ४ असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवर सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करतांना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी.

५. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारे प्रश्न सोडविणे सोयीस्कर आहे; पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

६. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

७. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या **प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक तृतीयांश गुण वजा करण्यात येतील**."

**Head Office : 1st Floor, Vidarbha Hindi Sahitya Sammelan, Jhansi Rani Sq. Sitabuldi, Nagpur-12.**

**Note : Test Series Paper Online available**

**Visit us**

www.spandancareers.org

१. **किटकनाशके अन्नसाखळयांमध्ये शिरकाव करून विविध पोषणपातळयांमध्ये (Trophic levels) संक्रमित होतात. पक्षांमध्यै किटकनाशकांच्या झालेल्या जैविक संचयन (Bioaccumulation) व जैविक विस्तारीकरण (Biomagnification) चा त्यांवर कोणता प्रतिकूल परिणाम होतो ?**

१) प्रजुननामध्ये अपयश (Reproductive Failure) २) वाढ खुटणे.

३) अंडकवच पातळ होणे (Egg shell thinning)

**योग्य पर्याय निवडा.**

अ) १ आणि २ ब) २ आणि ३ क) १ आणि ३ ड) १, २ आणि ३

---

२. **बोल्ड इगल (Bald Eagle) या पक्षांच्या संख्येत घट होण्यास खालीलपैकी कोणते किटकनाशक कारणीभूत ठरले ?**

अ) एंडोसल्फान ब) एल्ड्रीन क) डीडीटी ड) ओपीपी

---

३. **मानवाने पर्यावरणामध्ये केलेल्या अशाश्वत बदलामुळे मोठया प्रमाणावर जीवप्रजाती नामशेष होत आहेत, काही जीवशास्त्रज्ञ या मोठया प्रमाणावरील प्रजाती विलापास काय म्हणतात ?**

अ) तिसरा महाविलोप किंवा महानिर्वश (Third Mass Extinction)

ब) चौथा महाविलोप किंवा महानिर्वश

क) पाचवा महाविलोप किंवा महानिर्वश

ड) सहावा महाविलोप किंवा महानिर्वश

---

४. **'ओलिव्ह रिडले' (Olive Ridley) या सागरी कासवाबद्दल खालील विधानांचा विचार करा.**

१) हे जगात मुबलक असणारे सागरी कासव आहे.

२) या कासवाचा समावेश IUCN च्या तांबड्या यादीमध्ये झालेला आहे.

३) वाढत्या सागरी प्रदूषणामुळे त्यांच्या संख्येत होणारी घट चिंतेचा विषय बनलेला आहे.

**वरीलपैकी योग्य विधाने कोणती आहेत?**

अ) १ आणि २ ब) फक्त २ क) २ आणि ३ ड) १, २ आणि ३

---

५. **''गहिरमाथा' हे ठिकाण 'ओलिव्ह रिडले' (Olive Ridely) कासवांच्या प्रजनन स्थलांतरासाठी प्रसिद्ध आहे. हे ठिकाण कोणत्या राज्यामध्ये आहे?**

अ) महाराष्ट्र ब) ओडिशा क) आंध्र प्रदेश ड) प. बंगाल

---

६. **खालीलपैकी कोणता विभाग भारतातील १० जैवभौगोलिक विभागांपैकी नाही ?**

अ) ट्रान्स हिमालयीन विभाग ब) निम शुष्क विभाग

क) मध्य भारत विभाग ड) किनारपट्‌टी विभाग

---

७. **'रेड डेटा बुक' मधील 'गुलाबी पृष्ठे' (Pink pages) काय दर्शीवितात ?**

अ) धोकाग्रस्त बनलेल्या वन्यप्रजातींची यादी.

ब) धोक्याबाहेर पडलेल्या वन्यप्रजातींची यादी.

क) नामशेष किंवा विलोष पावलेल्या वन्यप्रजातींची यादी.

ड) स्थानविशिष्ट (Endemic) असणाऱ्या वन्यप्रजातींची यादी.

---

८. **'रेड डेटा बुक' मधील हरित पृष्ठे काय दर्शीवितात?**

अ) वन्यजीव संवर्धन कार्यक्रमांची स्थिती ब) पर्यावरण अवनतीची पातळी

क) वन्यजीवास असणारी धोक्याची पातळी ड) यापैकी काहीही नाही.

---

९. **'भारतीय वन सर्वेक्षण (Forest Survey of India) चे प्रादेशिक कार्यालय महाराष्ट्रात कुठे आहे ?**

अ) नागपूर ब) गडचिरोली क) ठाणे ड) नाशिक

---

१०. **वनक्षेत्रानुसार भारताचा जगात कितवा क्रमांक लागतो?**

अ) पाचवा ब) सातवा क) नववा ड) दहावा

---

११. **भारतातील एकूण वनक्षेत्राच्या किती टक्के वनक्षेत्र उष्ण कटिबंधीय शुष्क पानझडी वनाखाली आहे ?**

अ) १७% ब) २३% क) ३२% ड) ४१.५%

---

www.spandancareers.org

१२. **योग्य जोड्या जुळवा.**

| **हिमालयातील वने** | **उंची** |
|---|---|
| अ) पानझडी वने | १. पायथ्याशी |
| ब) आर्द्र समशीतोष्ण वने | २. १०००–२०००मी. |
| क) पाइन वने | ३. १५००–१७५०मी. |
| ड) कुरणे | ४. ४००० मी. पेक्षा जास्त |

**योग्य पर्याय निवडा.**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| अ) | १ | २ | ४ | ३ |
| ब) | २ | १ | ४ | ३ |
| क) | १ | २ | ३ | ४ |
| ड) | २ | १ | ३ | ४ |

---

१३. **हिमालयीन वनांबद्दल खालील विधानांचा विचार करा.**

१) उंचीनुसार पानझडी वने ते टुंड्रा वने असे संक्रमण हिमालयात आढळते.

२) देवदार हा वृक्ष केवळ पश्चिम हिमालयामध्येच सापडतो.

३) हिमालयाच्या उत्तर उतारावर वने ही दक्षिण उतारापेक्षा घनदाट आहेत.

**वरीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत.**

अ) फक्त १ ब) १ आणि २ क) १ आणि ३ ड) १, २ आणि ३

---

१४. **प्रतिपूरक वनीकरण (Compensatory Afforestation) म्हणजे काय ?**

अ) सामाजिक वनीकरणाचा एक महत्वाचा भाग.

ब) वनजमीन इतर वापरांसाठी हस्तांतरित करण्याच्या बदल्यात केलेले वनीकरण.

क) स्वयंसेवी बिगरशासकीय संस्थांनी केलेले वनीकरण.

ड) शासनाच्या संस्थांनी केलेले वनीकरण

---

१५. **एकूण वनक्षेत्राबाबतीत महाराष्ट्राचा देशात कितवा क्रमांक लागतो ?**

अ) तिसरा ब) चौथा क) पाचवा ड) सातवा

---

१६. **सर्वोच्च न्यायालयाने खालीलपैकी कोणत्या केसच्या निकालामध्ये एकच 'केंद्रीय प्रतिपूरक वनीकरण निधी' (Central Compensatory Afforestation Fund) स्थापन करण्याचे निर्देश दिले ?**

अ) राजगोपालन केस ब) गोदावर्मन केस

क) टी. ए. पाई फाऊंडेशन केस ड) राजगोपालचारी केस

---

१७. **'कॅम्पा' (CAMPA) खालीलपैकी कशाशी संबंधित आहे ?**

अ) खणनकार्य (Mining) ब) प्रतिपूरक वर्नीकरण (Compensatory afforestation)

क) पर्यावरण संवर्धन ड) मोठया धरणप्रकल्पांचे नियमन

---

१८. **महाराष्ट्रात सर्वात जास्त वन्यजीव अभयारण्ये कोणत्या विभागात आहेत ?**

अ) नागपूर ब) नाशिक क) अमरावती ड) कोकण

---

१९. **महाराष्ट्रातील पहिले वन्यजीव अभयारण्य १९५८ मध्ये कोणत्या जिल्हयात स्थापन झाले ?**

अ) नाशिक ब) पुणे क) अहमनगर ड) बुलढाणा

---

२०. **कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी अभयारण्यातील प्रमुख आकर्षण असणारा प्राणी कोणता ?**

अ) काळवीट ब) बाइसन (Bison) किंवा गवा

क) शेकरू ड) स्लॉथ अस्वल

---

www.spandancareers.org

२१. **महाराष्ट्राच्या वन्यजीवनाबाबत खालील विधानांचा विचार करा.**

१) हरियाल हा महाराष्ट्राचा राज्यपक्षी आहे.

२) उंदीर हरणे (Mouse Deer) महाराष्ट्रात सापडत नाहीत.

३) नागझिरा अभयारण्यामध्ये 'पिग्मी हॉग' आढळतो.

**वरीलपैकी योग्य विधाने ओळखा.**

अ) १ आणि २ ब) फक्त १ क) १ आणि ३ ड) १, २ आणि ३

---

२२. **हरियाल आणि खालीलपैकी कोणता पक्षी एकाच वर्गातील आहेत ?**

अ) कबूतर ब) बगळा क) मोर ड) चिमणी

---

२३. **शेकरू हा महाराष्ट्राचा राज्यप्राणी खालीलपैकी कोणत्या गटातील आहे ?**

अ) अस्वल ब) खार क) मांजर ड) हरिण

---

२४. **योग्य जोडया जुळवा.**

| **वन्यजीव अभयारण्य** | **जिल्हा** |
|---|---|
| अ) कारंजसोहोळ | १. नागपूर |
| ब) बोर | २. अकोला |
| क) मानसिंघदेव | ३. वर्धा |
| ड) टिपेश्वर | ४. यवतमाळ |
| | ५. बुलढाणा |

**योग्य पर्याय निवडा.**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| अ) | ५ | ३ | २ | ४ |
| ब) | ४ | ५ | २ | ३ |
| क) | २ | ३ | १ | ४ |
| ड) | ५ | ३ | १ | ४ |

---

२५. **'रनचा निष्काळजी राजा' असे कोणत्या वन्यप्राण्यास संबोधले जाते ?**

अ) वन्य गाढव ब) स्लॉथ अस्वल क) सिंह ड) बिबट्या

---

२६. **'हुॅलॉक गिबन' बाबत खालील विधानांचा विचार करा.**

१) भारतात सापडणारे हे एकमेव वानर (Ape) आहे.

२) या माकडास शेपटी नसते.

३) हे माकड भारतात केवळ प. घाट व निलगिरी पर्वतांमध्येच आढळते.

**वरीलपैकी योग्य विधान/ने ओळखा.**

अ) फक्त १ ब) २ आणि ३ क) १ आणि २ ड) १, २ आणि ३

---

२७. **खालील विधानांचा विचार करा.**

१) हिम चित्ता भारतामध्ये पश्चिम हिमालयात आढळतो.

२) क्लाऊडेड चित्ता ईशान्य भारतामध्ये आढळतो.

३) सूर्य अस्वल भारतामध्ये प. हिमालयांमध्ये आढळते.

**वरीलपैकी कोणते विधान/ने योग्य आहेत?**

अ) फक्त १ ब) १ आणि २ क) फक्त ३ ड) १, २ आणि ३

---

www.spandancareers.org

**२८. 'कस्तुरी हरिण' या प्राण्याबाबत खालील विधानांचा विचार करा.**

१) या हरणांना शिंगे नसतात.

२) कस्तुरी केवळ नर हरणांमध्येच सापडते.

३) ही हरणे केवळ दक्षिण भारतामध्ये आढळतात.

**वरीलपैकी योग्य विधान/ने ओळखा.**

अ) फक्त १ ब) फक्त २ क) १ आणि २ ड) १, २ आणि ३

---

**२९. खालीलपैकी कोणत्या वन्यप्राण्याच्या जन्मास भगवान बुद्ध गेले होते, असा लडाखमध्ये समज आहे ?**

अ) आयबेक्स ब) चिरू क) तिबेटन ताह्र ड) वन्य याक

---

**३०. कियांग हा गाढवासारख्या असणारा प्राणी भारतात कुठे आढळतो ?**

अ.) लडाख ब) गुजरात क) ईशान्य भारत ड) दक्षिण भारत

---

**३१. मलाबार सिव्हीट (Malabar Civet) या वन्यप्राण्याबाबत खालील विधानांचा विचार करा.**

१) मलाबार सिव्हीट हा प्राणी केवळ पश्चिम घाटामध्येच आढळतो.

२) हा प्राणी 'दुर्मिळ' या प्रवर्गामध्ये समाविष्ट झालेला आहे.

३) हा प्राणी रात्री कार्यरत असणारा आहे.

**वरीलपैकी योग्य विधाने ओळखा.**

अ) फक्त १ ब) १ आणि २ क) २ आणि ३ ड) १, २ आणि ३

---

**३२. भारतामध्ये आढळणाऱ्या व धोकाग्रस्त बनलेल्या वन्य प्राण्यांचा गट ओळखा.**

अ) गुलाबी मस्तकाचे बदक, डुगाँग, गौर, हुॅलॉक गिबन

ब) चित्ता, वाघ, हत्ती, गेंडा

क) लेसर एकशिंगी गेंडा, निलगरी ताह्र, आयबेक्स बाइसन

ड) मलाबार सिव्हीट, स्लो लोरीस, घरियास, निलगाय

---

**३३. खालीलपैकी अयोग्य जोडी / जोडया ओळखा**

| **भारतीय वन्यप्राणी** | | **धोक्याची पातळी/स्थिती** |
|---|---|---|
| १) चित्ता | – | नामशेष |
| २) रेड पांडा | – | संकटग्रस्त |
| ३) स्लो लोरीस | – | संवेदनशील |
| ४) तिबेटन वन्य गाढव | – | संकटग्रस्त |

**योग्य पर्याय निवडा**

अ) फक्त २ ब) २ आणि ३ क) १ आणि ३ ड) २ आणि ४

---

**३४. महा राजहंस (Great Flamingo) हे पक्षी भारतामधील कोणत्या वन्यजीव अभयारण्यामध्ये दरवर्षी स्थलांतर करताना आढळतात?**

अ) वेदारण्यन (Vedaranyan) ब) वाळवंट राष्ट्रीय उद्यान

क) मानस वन्यजीव अभयारण्य ड) काझिरंगा वन्यजीव अभयारण्य

---

**३५. हिमालयाच्या दक्षिण उतारावरील वने ही उत्तर उतारापेक्षा जास्त घनदाट आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे ?**

अ) दक्षिण उतारावरील कमी जंगलतोड ब) दक्षिण उतारावरील जास्त पर्जन्यमान

क) उत्तर उतारावरील जंगलांचे अतिशोषण ड) मुख्य कारण यांपैकी नाही

---

**३६. खालील वन्यजीव संरक्षित क्षेत्रांचा विचार करा.**

१) वन्यजीव अभयारण्य २) राष्ट्रीय उद्यान ३) जीवावरण राखीव क्षेत्र

**वरीलपैकी कोणती संरक्षित क्षेत्र/चे कोअर–बफर या रणनितीवर आधारलेली आहेत ?**

अ) फक्त २ ब) फक्त ३ क) २ आणि ३ ड) १, २ आणि ३

---

www.spandancareers.org

३७. **भारतातील राष्ट्रीय उद्याने आययुसीएन (IUCN) च्या कोणत्या संरक्षित क्षेत्र व्यवस्थापन संवर्गाअंतर्गत (Protected Area Management Category) येतात ?**

अ) Ia ब) II क) III ड) IV

---

३८. **योग्य जोडया जुळवा.**

| भारतातील संरक्षित क्षेत्र | IUCN संरक्षित क्षेत्र व्यवस्थापन संवर्ग |
|---|---|
| अ) राष्ट्रीय उद्यान | १. IV |
| ब) वन्यजीव अभयारण्य | २. III |
| क) नैसर्गिक वास्तू | ३. VI |
| ड) रामसर क्षेत्रे | ४. II |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| अ) | ४ | १ | २ | ३ |
| ब) | ४ | २ | १ | ३ |
| क) | ३ | ४ | १ | २ |
| ड) | २ | १ | ४ | ३ |

---

३९. **नागोया करार कोणत्या वर्षी स्वीकारण्यात आला ?**

अ) २००९ ब) २०१० क) २०११ ड) २०१२

---

४०. **जैवसुरक्षेशी (Biosafety) संबंधित असणारा खालीलपैकी कोणता करार आहे ?**

अ) नागोया करार ब) स्टॉकहोम करार क) रोटरडॅम करार ड) कार्टाजेना करार

---

४१. **योग्य जोड्या जुळवा.**

| जीवावरण राखीव क्षेत्र | राज्य/केंद्रशासित प्रदेश |
|---|---|
| अ) नोकरेक | १. केरळ |
| ब) सिमलीपाल | २. ओडिशा |
| क) अगस्थ मलाई | ३. आसाम |
| ड) द्रिबू साईखोला | ४. मेघालय |
| | ५. तामिळनाडू |

**योग्य पर्याय निवडा.**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| अ) | ३ | २ | १ | ४ |
| ब) | ४ | २ | ५ | ३ |
| क) | १ | ४ | २ | ३ |
| ड) | ४ | २ | १ | ३ |

---

४२. **भारतातील सर्वात पहिले 'जीवावरण राखीव क्षेत्र' कोणते ?**

अ) मानस ब) निलगिरी क) नंदा देवी ड) सुंदरबन

---

४३. **खालील 'जीवावंरण राखीव क्षेत्रांचा विचार करा.**

१) कांचनगंगा २) मन्नारचे आखात ३) सिमलीपाल ४) सेशचलम

५. देहांग–देबांग

**वरीलपैकी कोणत्या क्षेत्रांचा समावेश युनेस्कोच्या 'जागतिक जीवावरण राखीव क्षेत्रांचे जाळे' मध्ये झालेला आहे ?**

अ) १, २ आणि ३ ब) २ आणि ३ क) फक्त २ ड) १, २, ३, ४ आणि ५

---

४४. **शीत वाळवंट हे जीवावरण राखीव क्षेत्र कोणत्या राज्यामध्ये स्थित आहे ?**

अ) जम्मू आणि काश्मिर ब) उत्तराखंड क) हिमाचल प्रदेश ड) अरूणाचल प्रदेश

४५. **भारतातील सर्वात पहिले राष्ट्रीय उद्यान 'कॉर्बेट' हे कोणत्या वर्षी स्थापन करण्यात आले ?**

अ) १९२५ ब) १९३२ क) १९३५ ड) १९४३

४६. **पहिली व्याघ्र गणना कोणत्या वर्षी झाली?**

अ) १९७१ ब) १९७२ क) १९७३ ड) १९७४

४७. **व्याघ्र प्रकल्पासाठी आवश्यक असणारा निधी केंद्र सरकार व राज्य सरकार यांमध्ये कसा विभागला जातो?**

अ) २५ : ७५ ब) ९० : १० क) ५० : ५० ड) ७५ : २५

४८. **भारतामध्ये सर्वात जास्त वाघांची संख्या कोणत्या राज्यामध्ये आढळून आली ?**

अ) कर्नाटक ब) मध्य प्रदेश क) प. बंगाल ड) आसाम

४९. **भारतातील व्याघ्र राखीव क्षेत्रांची (अधिसूचीत झालेल्या) एकूण संख्या किती ?**

अ) ३७ ब) ३९ क) ४० ड) ४५

५०. **खालीलपैकी कोणत्या शहरास भारताची 'व्याघ्र राजधानी' किंवा भारताचे व्याघ्र प्रवेशद्वार' म्हणून घोषित करण्यात आले आहे ?**

अ) नागपूर, महाराष्ट्र ब) दिब्रूगड, आसाम

क) कोलकाता, पश्चिम बंगाल ड) ग्वालियर, मध्य प्रदेश

५१. **चित्ता हा प्राणी भारतात नामशेष म्हणून घोषित करण्यात आला. या प्राण्याचा पुर्नप्रवेश भारतामध्ये घडवून आणण्याचे चित्ता प्रकल्पाअंतर्गत प्रस्तावित आहे. हा पुर्नप्रवेश घडवून आणण्याची प्रमुख कारणे काय आहेत ?**

१) शुष्कप्रदेशीय परिसंस्थांना मूळ नैसर्गिक स्थितीत आणणे.

२) चित्ता हा आपला नैसर्गिक वारसा आहे.

३) पर्यटनाचा विकास होण्यासाठी

**योग्य पर्याय निवडा.**

अ) फक्त १ ब) १ आणि २ क) फक्त २ ड) १, २ आणि ३

५२. **घरियाल ही भारतात आढळणारी मगर कोणत्या प्रकारची आहे ?**

अ) नद्यांमध्ये आढळणारी ब) खाऱ्या पाण्यातील मगर

क) दलदलीय मगर ड) सागरी मगर

५३. **१९९२ मध्ये हत्ती प्रकल्प कोणते उद्देश घेऊन सुरू करण्यात आला ?**

१) हत्तींच्या अधिवास व कॉरिडॉर्सचे संवर्धन

२. मानव वन्यप्राणी संघर्षाची समस्या हाताळणे.

३. पाळीव हत्तींचे कल्याण

**योग्य पर्याय निवडा.**

अ) फक्त १ ब) फक्त २ क) १ आणि २ ड) १, २ आणि ३

५४. **दक्षिण आशियामध्ये २००३ मध्ये सुरू करण्यात आलेला 'माइक' (MIKE) हा प्रकल्प खालीलपैकी कोणत्या वन्य प्राण्यांच्या संरक्षण व संवर्धनासंदर्भात आहे ?**

अ) हत्ती ब) वाघ क) चित्ता ड) सिंह

५५. **'माइक' या प्रकल्पाअंतर्गत भारतातील किती हत्ती प्रदेशाची समावेश आहे ?**

अ) ७ ब) ९ क) १० ड) १२

५६. **महाराष्ट्रातील कोणत्या जिल्हयांमधील पर्यावरणाचा अभ्यास करण्याचे कार्य गाडगीळ तज्ज्ञगटास नेमून देण्यात आले होते?**

अ) सिंधुदुर्ग व रत्नागिरी ब) सिंधुदुर्ग व रायगड क) रायगड व रत्नागिरी ड) रायगड व ठाणे

www.spandancareers.org

**५७. प. घाटासंदर्भातील माधव गाडगीळ तज्ज्ञगटाच्या प्रमुख शिफारशी खालीलपैकी कोणत्या आहेत ?**

१) संपूर्ण प. घाटास 'परिस्थितिकीय संवेदनशील क्षेत्र' (Ecologically Sensitive Zone/ESZ) म्हणून घोषित करावे.

२) प. घाट प्रदेशाचे ESZ – 1, ESZ – 2 व ESZ – 3 असे वर्गीकरण करावे.

३) ESZ-1 मध्ये कुठल्याही मोठया धरणांना मान्यता देऊ नये.

४) अथिरापल्ली (Athirapally) व गुंडिया (Gundia) धरणांना मान्यता देण्यात यावी.

**योग्य पर्याय निवडा.**

अ) १ आणि २ ब) १, २ आणि ३ क) १, २ आणि ४ ड) १, २, ३ आणि ४

---

**५८. रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयांमधील खननकार्यासंदर्भात पश्चिम घाटांसंदर्भातील माधव गाडगीळ तज्ज्ञगटाने कोणत्या शिफारशी केल्या आहेत?**

१) ESZ – 1 व ESZ – 2 मधील नवीन खनन परवान्यांवर स्थगिती

२. ESZ – 2 मधील खननकार्य २०१६ पर्यंत पूर्णपणे बंद करणे.

३) 'धारण क्षमता अभ्यास' (Carrying Capacity Analysis) च्या आधारेच ESZ – 2 मधील नवीन खणन परवान्यांवरील स्थगिती उठविण्याचा पुर्नविचार.

अ) फक्त १ ब) फक्त २ क) १ आणि २ ड) १, २ आणि ३

---

**५९. 'परिस्थितिकीय नाजूक क्षेत्र' (Ecologically Fragile Area) ही संज्ञा सर्वप्रथम १९९१ मध्ये महाराष्ट्रातील कोणत्या प्रदेशासंदर्भात वापरण्यात आली ?**

अ) पाचगणी ब) महाबळेश्वर क) माथेरान ड) डहाणू

---

**६०. खालीलपैकी चुकीची जोडी ओळखा.**

| **सगरी संरक्षित क्षेत्र** | **राज्य** |
|---|---|
| १) महात्मा गांधी सागरी राष्ट्रीय उद्यान | – तामिळनाडू |
| २) राणी झांशी सागरी राष्ट्रीय उद्यान | – अंदमान व निकोबार द्विपसमूह |
| ३) गहिरमाथा | – आंध्र प्रदेश |

**योग्य उत्तर निवडा**

अ) फक्त १ ब) १ आणि २ क) १ आणि ३ ड) फक्त ३

---

**६१. गीरमधील काही सिंहांचे खालीलपैकी कोणत्या ठिकाणी पुर्नस्थानांतरण केले जाणार आहे ?**

अ) कुनो, मध्यप्रदेश ब) शाहगड, राजस्थान क) नौरादेही, मध्यप्रदेश ड) अमरकंटक, छत्तीसगड

---

**६२. बालहत्या (Infanticide) खालीलपैकी कोणत्या प्राण्यामध्ये आढळून येते ?**

अ) वाघ ब) सिंह क) प्यूमा ड) लांडगा

---

**६३. खालीलपैकी कोणती स्थळे व्याघ्र राखीव क्षेत्रे नाहीत?**

१) मुकुंद्रा टेकडया (Mukundra Hills) २) वाल्मिकी

३) सातकोसिया ४) पलामौ

**योग्य पर्याय निवडा.**

अ) फक्त १ ब) फक्त २ क) १ आणि ३ ड) वरीलपैकी एकही नाही

---

**६४. नव्याने स्थापन झालेले मुकुंद्रा टेकडया (Mukundra Hills) हे व्याघ्र राखीव क्षेत्र कोणत्या राज्यात स्थित आहे ?**

अ) राजस्थान ब) आंध्र प्रदेश क) तामिळनाडू ड) केरळ

---

**६५. खालील प्राण्यांचा विचार करा.**

१) व्हेल मासा २) पॉरपॉइज (Porpoiso) ३) डुगाँग (Dugong)

**वरील कोणते प्राणी सस्तनशील (Mammal) आहेत?**

अ) फक्त १ ब) फक्त २ क) १ आणि ३ ड) १, २ आणि ३

---

www.spandancareers.org

**६६. सागरी घोडा (Sea Horse/Hippocampus) हा कोणत्या प्रवर्गातील प्राणी आहे ?**

अ) कार्टीलॅजिनस मत्स्यवर्गीय (Cartilagenous fishes)

ब) अस्थिमत्स्य वर्गीय (Bony Fishes)

क) उभयचर (Amphibia)

ड) सस्तनशील (Mammal)

---

**६७. बीएनएचएस (Bomay Natural History Society/BNHS) या संस्थेचे बोधचिन्ह काय आहे?**

अ) ग्रेट हॉर्नबील ब) व्हल्चर (गिधाड) क) मोठी खार ड) शेकरू (Giant Squirrel)

इ) माथेरान फ) डहाणू

---

**६८. 'युट्रॉफिकेशन' (जलीय परिसंस्थांमध्ये) होण्यास कारणीभूत ठरणाऱ्या फॉस्फेट्सचा खालीलपैकी कोणता स्त्रोत आहे ?**

अ) डिटर्जंट पावडर ब) निर्जतुकीकरण पदार्थ (डिसइनफेक्टंट्स)

क) आरगॅनोक्लोरिन्स ड) सिंथेटीक पॉलीमर

---

**७९. दगडफूल (Lichens) हवेतील कोणत्या प्रदूषकास अधिक संवेदनशील असतात ?**

अ) सल्फर डायऑक्साईड ब) नायट्रस ऑक्साईड

क) PAN (पेरॉक्सिॲसिटील) नायट्रेट) ड) शिसे

---

**७०. शिसे (Lead) चे खालीलपैकी कोणते स्त्रोत आहेत ?**

१) रंग २) स्मेल्टींग उद्योग (Smelting Units)

३) किटकनाशके ४) सेरॅमिक्स (Ceramics)

**योग्य पर्याय निवडा.**

अ) १ आणि २ ब) १, ३ आणि ४ क) १, २ आणि ४ ड) १, २, ३ आणि ४

---

**७१. ॲसिड प्रेसिपिटेशन (Acid Precipitation) म्हणजेच आम्लवर्षण ही संज्ञा सर्वप्रथम कोणी मांडली ?**

अ) रॉबर्ट स्मिथ ब) ओडम क) हेकेल ड) हचिसन

---

**७२. खालीलपैकी क्लोरोफ्लुरोकार्बन्सला पर्याय असणारा कोणता पदार्थ हरितगृह परिणाम घडवून आणत नाही?**

अ) हायड्रोफ्लुरोकार्बन्स ब) अमोनिया

क) हायड्रो–क्लोरोफ्लुरोकार्बन्स ड) हायड्रोजन सल्फाईड

---

**७३. ओझोनच्या अवक्षयामुळे पृथ्वीवर येणाऱ्या अतिनील किरणांचा मानवी आरोग्यावर कोणता परिणाम घडू शकतो ?**

१) त्वचेचा कर्करोग २) मोतीबिंदू (Cataract) ३) श्वसनाचे रोग

**योग्य पर्याय निवडा.**

अ) फक्त १ ब) १ आणि २ क) १ आणि ३ ड) वरील सर्व

---

**७४. खालीलपैकी कोणते ओझोनचा अवक्षय करणारे पदार्थ आहेत ?**

१) हायड्रोक्लोरोफ्लुरोकार्बन्स २) हायड्रोफ्लुरोकार्बन्स ३) मिथाईल क्लोरोफॉर्म

४) कार्बन टेट्राक्लोराईड ५) नायट्स ऑक्साईड

**योग्य पर्याय निवडा.**

अ) १, ४ आणि ५ ब) १, ३ आणि ५ क) ३, ४ आणि ५ ड) १, ३, ४ आणि ५

---

**७५. आंतरराष्ट्रीय हवामान निधीची (International Meteorological Fund) स्थापना कोणत्या करारानुसार झाली ?**

अ) लंडन करार (London Convention) ब) व्हिएन्ना करार (Vienna Convention)

क) मॉंट्रीयल करार (Montreal Protocol) ड) हेंलसिकी करार (Helsinki Convention)

---

**७६. क्लोरोफ्लुरोकार्बन्स १९२८ मध्ये सर्वात प्रथम कोणी वापरात आणले ?**

अ) जनरल मोटर्स ब) इंटरनॅशनल बिझनेस मशिन (IBM)

क) जगुआर ड) मर्सिडीस बेंझ

---

**७७. भातशेतीच्या मोठ्या प्रमाणात लागवडीमुळे काही प्रदेश जागतिक तापमानवाढीस कारणीभूत ठरत आहेत. याची संभावित कारणे कोणती ?**

१) भात लागवडीशी संबंधित हवारहित परिस्थितीमुळे (anaerobic conditions) मिथेनचे उत्सर्जन होते.

२) नत्रयुक्त खतांचा वापर केल्याने मृदेतून नायट्रस ऑक्साइडचे उत्सर्जन होते.

**वरीलपैकी योग्य विधान / ने निवडा.**

अ) फक्त १ ब) फक्त २ क) १ आणि २ ड) वरीलपैकी एकही नाही

---

**७८. खालील वातावरणीय प्रदूषकांचा विचार करा.**

१) काजळी २) सल्फर हेक्झाफ्लोराइड ३) बाष्प

**वरीलपैकी कोणते घटक जागतिक तापमान वाढीस कारणीभूत आहेत ?**

अ) १ आणि २ ब) फक्त ३ क) २ आणि ३ ड) १, २ आणि ३

---

**७९. कार्बन मोनोक्साइडच्या हवेतील अतिरिक्त उत्सर्जनामुळे मानवी शरीरात ऑक्सिजनचा पुरवठा कमी होतो. हे कशामुळे घडते ?**

अ) श्वसन केलेल्या CO चे मानवी शरीरात $CO_2$ मध्ये रूपांतर होते.

ब) रक्तातील हिमोग्लोबीनशी बंध निर्माण करण्याची CO ची क्षमता ही $O_2$ पेक्षा जास्त आहे.

क) श्वसन केलेला CO हिमोग्लोबीनच्या रासायनिक संरचनेत बिघाड करतो.

ड) श्वसन केलेला CO हा मेंदूतील श्वसन केंद्रावर विपरित परिणाम करतो.

---

**८०. खालील प्रदूषकांचा विचार करा.**

१) कार्बन डायऑक्साइड्स २) नायट्रोजनचे ऑक्साइड्स ३) सल्फरचे ऑक्साइड्स

**वरीलपैकी कोणत्या प्रदूषकांचे उत्सर्जन औष्णिक विद्युत प्रकल्पांमध्ये दगडी कोळशाच्या ज्वलनाने होते?**

अ) फक्त १ ब) २ आणि ३ क) १ आणि ३ ड) १, २ आणि ३

---

**८१. अंटार्क्टिकामधील ओझोन विवर हा चिंतेचा विषय बनलेला आहे. हे विवर तयार होण्याचे कारण कोणते?**

अ) तपांबरामधील अस्थिरता आणि क्लोरोफ्लुरोकार्बन्सचा अंर्तप्रवाह.

ब) ध्रुवीय आघाडी (Polar Front) आणि स्थितांबरीय ढगांची उपस्थिती, क्लोरोफ्लुरोकार्बनचा अंर्तप्रवाह.

क) ध्रुवीय आघाडी आणि स्थितांबरीय ढगांची अनुपस्थिती; आणि मिथेन व क्लोरोफ्लुरोकार्बन्सचा अंर्तप्रवाह.

ड) जागतिक तापमानवाढीमुळे ध्रुवीय प्रदेशांमधील वाढलेले तापमान

---

**८२. कार्बन क्रेडीत संदर्भात खालीलपैकी कोणते विधान योग्य नाही ?**

अ) कार्बन क्रेडिट ही व्यवस्था क्योटो प्रोटोकॉलअंतर्गत आहे.

ब) उत्सर्जन कोट्यापेक्षा कमी उत्सर्जन असणाऱ्या देशांना किंवा गटांना कार्बन क्रेडिट्स दिले जातात.

क) कार्बन डायऑक्साइड उत्सर्जनाची वाढ रोखणे हे कार्बन क्रेडिट व्यवस्थेचे उद्दिष्ट आहे.

ड) संयुक्त राष्ट्रसंघ पर्यावरण कार्यक्रम (UNEP) ने वेळोवेळी निर्धारित केलेल्या किंमतीला कार्बन क्रेडिट्सचा व्यापार चालतो.

---

**८३. भारतातील सागरी पाण्यामध्ये हानीकारक शैवालांची मोठया प्रमाणावर झालेली वाढ हा चिंतेचा विषय बनत आहे. या शैवालवाढीची कोणती कारणे असू शकतात ?**

१) खाड्यांमधून पोषणप्रव्ये सागरी पाण्यात येणे. २) मान्सूनमध्ये भूभागावरून वाहून आलेले पाणी.

३) सागरामधील उत्प्रवाह (Upwelling)

**योग्य पर्याय निवडा.**

अ) फक्त १ ब) १ आणि २ क) २ आणि ३ ड) १, २ आणि ३

---

**८४. अलिकडेच 'ऑईल झॅपर' हे तंत्रज्ञान बरेच चर्चेत होते. हे तंत्रज्ञान नेमके काय आहे ?**

अ) खनिज तेल पसरलेल्या किंवा खनिज तेल गळती झालेल्या क्षेत्रांचे पुनरूत्थान करण्यासाठी परिस्थितिकी अनुकूल तंत्रज्ञान आहे.

ब) सागरी पाण्याखाली खनिज तेलाचा शोध घेण्यासाठी विकसित केलेले नवीन तंत्रज्ञान.

क) जैवइंधनाचे जास्त उत्पादन करणारे जनुकीय संशोधित मका पीक.

ड) खनिज तेल विहिरींमधून अपघाताने निघणाऱ्या ज्वालांचे नियंत्रण करण्यासाठी विकसित केलेले नवीन तंत्रज्ञान.

---

**८५. ओझोन थर संरक्षण व्हिएन्ना करार कधी स्वीकारण्यात आला ?**

अ) १९८५ ब) १९८७ क) १९९१ ड) १९९०

---

**८६. खालीलपैकी कोणता घटक जैविक विस्तारीकरणाशी (बायोमॅग्निफिकेशन) संबंधित नाही ?**

अ) क्लोरीनेटेड हायड्रोकार्बन्स ब) जड धातू

क) ऑरगॅनो फॉस्फेट्स ड) पॉलिक्लोरिनेटेड बायफिनाइल्स

---

**८७. किडींच्या नियंत्रणासाठी खालीलपैकी कोणत्या पोषण पातळीवर डीडीटी चा वापर केला जातो ?**

अ) प्राथमिक उत्पादक ब) प्राथमिक भक्षक

क) द्वितीयक भक्षक ड) तृतीयक भक्षक

---

**८८. विधान (A) :** संपूर्ण पृथ्वीवर पसरलेल्या जीवावरणाची सीमा हीच केवळ सुस्पष्ट असणारी जीवसमुदायाची एकमेव सीमा आहे.

**कारण (R) :** जीवसमुदायांना स्थान व कालसापेक्ष विशिष्ट आणि निश्चित सीमा नसते.

**योग्य पर्याय निवडा.**

अ) दोन्ही बरोबर आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ब) दोन्ही बरोबर आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही.

क) (A) बरोबर आणि (R) चूक

ड) (A) चूक आणि (R) बरोबर

---

**८९. विधान (A) :** किटकांमध्ये किडनाशकांना प्रतिकारक्षमता निर्माण होतांना आढळते.

**कारण (R) :** 'नैसर्गिक निवड' (Natural Selection) ही सर्व सजीवांवर प्रभाव पाडणारी संकल्पना आहे.

**योग्य पर्याय निवडा.**

अ) दोन्ही बरोबर आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ब) दोन्ही बरोबर आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही.

क) (A) बरोबर आणि (R) चूक

ड) (A) चूक आणि (R) बरोबर

---

**९०. खालील सजीवांचा विचार करा.**

१) जीवाणू २) बुरशी ३) पुष्पीय वनस्पती

**वरीलपैकी कोणत्या सजीवांच्या काही प्रजाती जैवकिटकनाशके (Biopesticides) म्हणून वापरल्या जातात ?**

योग्य पर्याय निवडा.

अ) फक्त १ ब) १ आणि ३ क) १ आणि ३ ड) १, २ आणि ३

---

**९१. कार्बन क्रेडीट ही संकल्पना कोठे उदयास आली ?**

अ) वसुंधरा परिषद, रिओ–दि–जनेरो ब) क्योटो प्रोटोकॉल

क) मॉंट्रियल प्रोटोकॉल ड) जी–८ परिषद, न्यूयॉर्क

---

९२. **क्लोरिनयुक्त हायड्रोकार्बन गटातील एक किटकनाशक अन्नपीकांवर फवारले जाते संबंधित अन्नसाखळी अशी –**

अन्नपीक–उंदीर–साप–गिधाड या अन्नसाखळीतील कोणत्या सजीवांमध्ये हे किटकनाशक सर्वात जास्त प्रमाणात साठेल? योग्य पर्याय निवडा.

अ) अन्नपीक ब) उंदीर क) साप ड) गिधाड

---

९३. **जलप्रवाहातील प्रदूषण खालीलपैकी कोणता सजीवांचा समूह जास्त योग्य प्रकारे सूचित करतो ?**

अ) प्लवंग ब) न्यूस्टॉन क) बेन्थॉस ड) नेक्टॉन्स

---

९४. **खालीलपैकी वातावरणातील $CO_2$ सर्वात जास्त शोषून घेणारा घटक कोणता ?**

अ) शेतजमीन ब) जीवाणू क) वने ड) महासागर

---

९५. **खालील प्रदेशांचा विचार करा.**

१) अंदमान निकोबार बेटसमूह २) पश्चिम घाट ३) उत्तर प्रदेश

४) ईशान्य भारत ५) पश्चिम बंगाल

**वरीलपैकी कोणत्या प्रदेशात पर्जन्यवने आढळतात ?**

अ) २, ३, ५ ब) १, ३, ४ क) १, २, ४ ड) १, २, ३, ४, ५

---

९६. **विधान (A) :** हरितगृह वायू वातावरणास उबदार ठेवतात व वातावरणास जीवनासाठी अनुकूल करतात.

**कारण (R) :** हरितगृह वायूंशिवाय वातावरणाचे तापमन 15°C ते – 20°C पर्यंत कमी होईल, जे जीवनासाठी प्रतिकूल ठरेल.

**योग्य पर्याय निवडा.**

अ) दोन्ही बरोबर आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ब) दोन्ही बरोबर आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही.

क) (A) बरोबर आणि (R) चूक

ड) (A) चूक आणि (R) बरोबर

---

९७. **आर्सेनिक प्रदूषणाने कोणता आजार होतो ?**

अ) हाडांचे फ्लुओरिसित (Fluorisis) ब) इटाई इटाई

क) ब्लॅक फूट रोग ड) मेट हिमोग्लोबिन

---

९८. **स्मॉग (Smog) मधील डोळयांची जळजळ होण्यास सर्वात अधिक जबाबदार असणारा घटक कोणता ?**

अ) CFC ब) Ozone क) PAN ड) SO

---

९९. **खालीलपैकी द्वितीयक हवा प्रदूषक कोणता ?**

अ) धूलिकण ब) काजळी क) CO ड) PAN

---

१००. **खालीलपैकी कोणते प्रदूषक जैवविघटनशील नाही ?**

अ) सांडपाणी ब) घरगुती कचरा

क) सॉफ्ट पेये (Soft drink cans) ड) प्राण्यांचे उत्सर्जित पदार्थ

---

***!!! Best of Luck !!!***

www.spandancareers.org

# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

Mob. No. 9923262977

MIN

राज्यसेवा (पूर्व) सराव परिक्षा - 2020

विषय : – पर्यावरण [099]

Total Que. :100
Marks : 200
Time : 120

## FINAL ANSWER KEY- ENVIRONMENT [099] – [SET A ]

| QUE | ANS | QUE | ANS | QUE | ANS | QUE | ANS |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 26 | 2 | 51 | 2 | 76 | 1 |
| 2 | 3 | 27 | 2 | 52 | 1 | 77 | 1 |
| 3 | 4 | 28 | 3 | 53 | 4 | 78 | 4 |
| 4 | 1 | 29 | 1 | 54 | 1 | 79 | 2 |
| 5 | 2 | 30 | 1 | 55 | 1 | 80 | 4 |
| 6 | 3 | 31 | 4 | 56 | 1 | 81 | 2 |
| 7 | 1 | 32 | 4 | 57 | 2 | 82 | 4 |
| 8 | 1 | 33 | 1 | 58 | 4 | 83 | 2 |
| 9 | 1 | 34 | 1 | 59 | 4 | 84 | 1 |
| 10 | 4 | 35 | 2 | 60 | 3 | 85 | 2 |
| 11 | 4 | 36 | 3 | 61 | 1 | 86 | 2 |
| 12 | 3 | 37 | 2 | 62 | 2 | 87 | 2 |
| 13 | 2 | 38 | 1 | 63 | 4 | 88 | 1 |
| 14 | 2 | 39 | 2 | 64 | 1 | 89 | 1 |
| 15 | 2 | 40 | 4 | 65 | 4 | 90 | 4 |
| 16 | 2 | 41 | 2 | 66 | 2 | 91 | 1 |
| 17 | 2 | 42 | 2 | 67 | 1 | 92 | 4 |
| 18 | 1 | 43 | 2 | 68 | 1 | 93 | 3 |
| 19 | 2 | 44 | 3 | 69 | 1 | 94 | 4 |
| 20 | 2 | 45 | 3 | 70 | 4 | 95 | 3 |
| 21 | 2 | 46 | 2 | 71 | 1 | 96 | 1 |
| 22 | 1 | 47 | 3 | 72 | 2 | 97 | 3 |
| 23 | 2 | 48 | 1 | 73 | 3 | 98 | 3 |
| 24 | 3 | 49 | 4 | 74 | 4 | 99 | 4 |
| 25 | 1 | 50 | 1 | 75 | 4 | 100 | 3 |

**Save Paper, Save Tiger”**

www.spandancareers.org